विश्वस्तांची नावे :

१. श्री. सिताराम लाड — २. सौ. मीराताई लाड

३. श्री. विष्णु प्रभुदेसाई — ९३२४५०३०२०

४. सौ. सुप्रिया घोटगे — ९८२०९१०११५

५. श्री. विनय घोटगे — ९५५२५२२१३२

अधिक माहीतीसाठी व देणगी साठी वरील क्रमांकांवर संपर्क साधावा.



'निरामय दवाखाना व निरामय आधारघर' या खैरेवाडी येथील नविन प्रकल्पासाठी अंदाजे खर्च

| | |
|---|---|
| तीन एकर जमीन | रू. १० लाख |
| वृध्दाश्रम इमारत बांधकाम खर्च (८९० स्क्वे. मी. लिफ्ट सहित अंदाजे) | रू. १४३ लाख |
| कार्यकर्त्यांसाठी राहण्याची सोय (१२० स्क्वे. मी. अंदाजे) | रू. २० लाख |
| प्राथमिक आरोग्य केंद्र (इमारत बांधकाम) (१२० स्क्वे. मी. अंदाजे) | रू. २० लाख |
| फर्निचर (सुमारे ५० निवासींसाठी पलंग, टेबल, कपाट इ. सामान) | रू. ६० लाख |
| स्वयंपाकघरातील सामान | रू. ५ लाख |
| बागबगिचा | रू. ५ लाख |
| प्रकल्पामधील रस्ते | रू. १० लाख |
| जमिनीअंतर्गत पाण्याची टाकी, पाईप, पंप | रू. २५ लाख |
| इलेक्ट्रीकल कनेक्शन, जनरेटर | रू. २५ लाख |
| **एकूण अंदाजे खर्च** | **रू. ३२३ लाख** |

**नोंदणीकृत कार्यालय :**

**'राजीव – रजन लाड ट्रस्ट'**

व्दारा, डॉ. सौ. अमिता स. साखळकर

२०४-बी, बिंद्रा क्लासिक, बिल्डिंग नं. ५,

शेरे पंजाब सोसा., महाकाली रोड,

अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३

पत्रव्यवहारासाठी पत्ता :

**'राजीव – रजन लाड ट्रस्ट'**
**C/o श्री. सिताराम लाड**
**१३१, नर्मदा कॉम्प्लेक्स, पहिला मजला, ३९८, स्टेशन रस्ता, पनवेल -४१०२०६.**
**दूरध्वनी : (०२२) २७४५८२७१**

**'राजीव – रजन लाड ट्रस्ट'**
**C/o श्री. विनय वसंत घोटगे**
**३०१, अध्वर सर्व्हे, क्र. १११/९, प्रभातरोड, गल्ली क्र. १४, एरंडवणे, पुणे ४११००४.**
**दूरध्वनी : (०२०) २५४५४७५३**



# 'राजीव – रजन लाड ट्रस्ट'

## करूणा, प्रेम, शांती यांची सदा येथे वसती



सर्वेऽपि सुखिनः सन्तु ।
सर्वे सन्तु निरामयाः ॥

**आमचा नविन प्रकल्प**

## 'निरामय दवाखाना व निरामय आधारघर' खैरेवाडी

## 'राजीव - रजन लाड ट्रस्ट'

हा एक नोंदणीकृत सार्वजनिक न्यास आहे. हा न्यास केवळ रू १०००/- एवढया प्राथमिक भांडवलानिशी १९८४ मध्ये स्थापन करण्यात आला. (नोंदणी क्रमांक E-10130, Mumabi Dis)

श्री. सिताराम आणि सौ. मीराताई लाड यांची राजीव आणि रजन ही दोन जुळी मुले होती. १९८२ - ८३ मध्ये हया दोघांच्या आकस्मिक दु:खद निधनानंतर सामाजिक कार्याचे ध्येय समोर ठेवून त्या दोघांच्या नावे हा सार्वजनिक न्यास सुरू करण्यात आला. ह्या न्यासातर्फे लाड पतीपत्नी यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक कार्यामध्ये झोकून दिले आहे.

कुष्ठरोग निवारण समितीच्या वृद्धाश्रमामध्ये काम करीत असताना मीराताईंना विकलांग / परावलंबी असणाऱ्या लोकांसाठी काम करणे आवश्यक आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली. **'राजीव - रजन लाड ट्रस्ट'**ने याचा गांभीर्याने विचार केला आणि कुष्ठरोग निवारण समिती समोर कल्पना मांडली. कुष्ठरोगनिवारण समितीची जमीन आणि **राजीव - रजन लाड ट्रस्ट** चे आर्थिक सहाय्य यामधून **'राजीव - रजन आधारघराचे'** काम १९९७ मध्ये सुरू झाले. नावातच घराचा उल्लेख **'राजीव - रजन लाड ट्रस्ट'** ने जाणीवपूर्वक केला आहे. घरासारखे मोकळे वातावरण, घरात मिळणारे प्रेम, जिव्हाळा, आपुलकी निवासींना मिळाला पाहिजे याचा विचार करूनच **राजीव-रजन आधारघरा**चे काम सुरू झाले.

आधारघरात प्रवेश घेतलेल्या निवासींची देखभाल त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत केली जाते. आजारपणानुसार त्यांना औषधपाणी व सेवा वेळच्यावेळी तत्परतेने पुरवली जाते. काही निवासींना बिछान्याला खिळून राहण्याची वेळ येते. अशावेळी वेद्यकीय सेवेबरोबरच त्यांना मानसिक आधाराचीही गरज असते. तसा मानसिक आधार देण्याचा पूर्ण प्रयत्न **आधारघरातील** कार्यकर्ते मनापासून करीत असतात.

**आधारघरातील** सर्व कार्यकर्ते केवळ पैशाच्या उद्देशाने काम करणारे नसून सेवाभावी वृत्तीने दिवसरात्र कार्यरत आहेत. त्यांची निवड करताना प्रेमाने आणि काळजीपूर्वक सेवा करण्याची मानसिकता हाच निकष लावला जातो. **राजीव - रजन आधारघरा**चे संपूर्ण कार्य 'ना नफा ना तोटा' या तत्वावर चालते. निवासींकडून अल्प शुल्क घेतले जाते. शेवटच्या श्वासापर्यंत आपले आयुष्य समाजासाठी व्यतित केलेल्या काही गरजू आजारी व्यक्तींना मात्र नि:शुल्क सेवा पुरवली जाते.

गेल्या १४ वर्षे ह्या क्षेत्रामध्ये कार्य करीत असताना काही सामाजिक प्रश्न **'राजीव - रजन लाड ट्रस्ट'**च्या लक्षात आले आहेत.

१. मोठ्या शहरामध्ये दैनंदिन जीवन अतिशय धकाधकीचे आणि धावपळीचे झाले आहे. नव्या पिढीच्या एकंदर कामाच्या पद्धतीमुळे त्यांना मोकळा वेळ मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे लहान जागेमध्ये घरातील वृद्ध आणि आजारी व्यक्तींना पुरेसा वेळ देऊन त्यांची प्रेमाने चौकशी करणे खूपच ओढाताणीचे होत आहे. मनात असूनही परावलंबी ज्येष्ठ मंडळींची सेवा करता येत नाही.

२. एखाद्या वेळेस मनाजोगती सेवा करणे जमले तरी पतीपत्नी कामानिमित्त घराबाहेर असतात. मुले शिक्षणानिमित्त, नोकरीच्या कारणाने बाहेर असतात. घरात असली तरी आपापल्या अभ्यासात, मित्रमंडळीमध्ये दंग असतात. अशावेळी ज्येष्ठ आणि परावलंबी मंडळींना एकाकीपणा जाणवण्याची शक्यता असते. मानव स्वभावत:च समाजप्रिय असल्यामुळे हा एकाकीपणा अधिक जाचक होऊ शकतो.

३. समाजातील विशेषत: खेड्यातील / लहान गावातील गरीब लोकांना त्यांच्या बारीकसारीक आजारांसाठी वैद्यकीय सेवा जवळपास उपलब्ध होऊ शकत नाही. त्यासाठी त्यांना मोठ्या गावाकडे / शहराकडे धाव घ्यावी लागते.

४. **राजीव - रजन आधारघरा**तील प्रतीक्षायादी दिवसेंदिवस वाढते आहे.

वरील बाबी लक्षात घेऊन **'राजीव - रजन लाड ट्रस्ट'** च्या विश्वस्तांनी एक नविन जागा खरेदी करण्याचा विचार केला, ज्याठिकाणी वृद्ध आणि विकलांग व्यक्तींसाठी सेवा सुरू करता येईल.

अनेक ठिकाणी जागा पाहिल्यानंतर ट्रस्टने तीन एकरचा एक भूखंड खरेदी केला आहे. हा भूखंड पुणे-अहमदनगर रस्त्यावर शिक्रापूर ह्या गावाजवळ खैरेवाडी ह्या खेड्यामध्ये आहे. ही जागा पुणे शहरापासून ४५ कि.मी. अंतरावर असून मुख्य रस्त्यापासून अगदी अंतर्गत भागातही नाही किंवा शहरी गजबजाटातही नाही. त्यामुळे हया ठिकाणी नियोजित प्रकल्प समाधानकारकरित्या कार्यान्वित करता येईल असा विश्वास वाटतो. शिवाय भोवतालच्या ८-१० कि.मी. परिसरात दवाखाना नसल्यामुळे धर्मादाय दवाखाना सुरू करावा असेही **राजीव - रजन लाड ट्रस्ट**ने ठरवले आहे.

**'निरामय दवाखाना व निरामय आधारघर'** या नविन प्रकल्पाच्या उभारणीचा एकंदर खर्च साधारणपणे रू. ३ कोटीच्या आसपास होईल असा अंदाज आहे.

**'राजीव - रजन लाड ट्रस्ट' ह्या पत्रकाद्वारे समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांना ह्या प्रस्तावित नविन प्रकल्पासाठी सढळ हस्ते मदत करण्याची विनंती करीत आहे.**

देणगीचे चेक कृपया **'राजीव - रजन लाड ट्रस्ट'** या नावाने काढावेत.

**'राजीव - रजन लाड ट्रस्ट'** च्या सर्व आर्थिक व्यवहारांचे ऑडिट दरवर्षी केले जाते. नियोजित प्रकल्पासाठी येणाऱ्या देणग्यांसाठी आयकर नियमानुसार ८० जी ह्या कलमान्वये आयकरामध्ये सूट मिळू शकते.

रू. ५,००,०००/-एवढी देणगी देणाऱ्या व्यक्तीच्या इच्छेनुसार एखाद्या खोलीला किंवा कक्षाला नाव दिले जाईल.

रू १,००,०००/- एवढी देणगी देणाऱ्या व्यक्तींची नावे देणगीदारांच्या नामफलकावर नमूद करण्यात येतील.

'राजीव - रजन आधारघर', नेरे, पनवेल येथील कार्याची छायाचित्रे.








